NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक ०६.११.२०२६ शुक्रवार

मा. न्यायालयातुन आरोपीस चांगल्या वर्तणुकीसह आर्थिक दंडाची शिक्षा :–

दिनांक ०६.११.२०२६ रोजी मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, महानगर पालिका न्यायालय क्र. १, नागपूर श्री. अ. न. जगताप साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ५३४४/२०२५ मधील, पोलीस ठाणे इमामवाडा येथील अप. क्र. ३५२/२०२५ कलम १३२,१२१(१),३५२ भा.न्या.सं., सहकलम ३(२)(ई) सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम–१९८४ या गुन्ह्यातील आरोपी प्रशांत शत्रुघ्न अरखेल, वय ४३ वर्षे, रा. तुकडोजी पुतळा, म्हॉडा कॉलनी, १/२२, अजनी, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम कलम १३२ भा.न्या.सं. तसेच, कलम २७१(२) भा.ना.सु.सं. अन्वये दोषी ठरवुन, गुन्हेगार परिविक्षाकाल अधिनियम–१९५८ चे कलम ४ अन्वये चांगल्या वर्तणुकीच्या ०१ वर्षे मुदतीच्या बॉन्डवर ५,०००/–रू. नुकसान भरपाई ची शिक्षा ठोठावली. तसेच नुकसान भरपाईची रक्कम फिर्यादीस देण्यात यावी असे आदेशीत केले. त्याचप्रमाणे, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ ची पुर्तता करण्याकरीता १५,०००/– रु. चे बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन सादर करणेबाबत आदेशीत केले.**

दिनांक १६.०६.२०२५ चे रात्री ०१.२५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा येथे रात्रपाळी कर्तव्यावर असेलेले फिर्यादी पोअं. संजय गावंडे पोलीस ठाणे येथे हजर असतांना, तेथे एक महिला नामे सौ. यामिनी प्रशांत अरखेल, वय ३५ वर्ष, रा. जाटरोडी क्र. २, दुर्गामाता मंदीर जवळ, इमामवाडा हया आल्या व त्यांनी आपली कैफीयत सांगितली की, त्यांचे नमुद आरोपी पतीने त्यांना तुकडोजी पुतळा जवळ रस्त्यावर सोडल्याने, त्यांना घरी जायचे आहे. यावरुन फिर्यादी हे रात्रपाळी अधिकारी पोउपनि. निलेश टेमगिरे यांचेसह नमुद महिलेला तिचे घरी घेऊन गेले असता, महिलेचा पती आरोपीने तिला घरी का आणले या कारणावरुन आरडा–ओरडा करुन व आदळआपट करुन, पिटर मोबाईल वाहन क्र. एम.एच ३१ एफ.एक्स ५३४८ चे नुकसान केले. तसेच, फिर्यादीस शिवीगाळ करुन व त्यांचे अधिकारी यांचे अंगावर जाऊन ते करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक १६.०६.२०२५ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि. निखिल चाफले यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती मिनाक्षी करारे यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. एम. एस. बेग यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. सुरेखा सोनोने व कल्पना मसराम यांनी काम पाहिले.

(कामगिरी)

१) जुनी कामठी पोलीसांची कामगिरी :– गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०६.११.२०२६ चे ००.४५ वा. ते ०२.०० वा. चे दरम्यान, जुनी कामठी पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत मंशाराम शाळेजवळ, रूईगंज मैदान, कामठी येथे होंडा कंपनीचे डिओ मोपेड क्र. एम.एच ३१ डि.वाय ५२४१ वरील एक ईसम अंमली पदार्थ गांजा विक्री करण्याकरीता उभा आहे. अशा प्राप्त माहितीवरून घटनास्थळी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम मोपेड गाडीसह दिसुन आला. त्याचेजवळ जात असतांना तो पोलीसांना पाहुन पळून जाण्याचे तयारीत असतांना, त्यास घेराव करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव मोहम्मद फहीम शेख मोहम्मद निझामुद्दीन शेख, वय ३२ वर्षे, रा. हजहाऊस जवळ, कांजीपुरा, गणेशपेठ, नागपुर असे सांगीतले. एन.डी.पी.एस. कायद्याचे तंतोतंत पालन करून, पंचासमक्ष त्याचे जवळील पिशवीची, वाहनाची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील पांढरे रंगाचे पिशवीमध्ये झाडपत्ती सारखा, ओलसर व उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा वजनी ८९५ ग्रॅम मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा, ०१ मोबाईल फोन, एक डिओ मोपेड असा एकुण ६०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे जुनी कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. विजय दिघे, पोउपनि. दिगांबर बोरकर, पोहवा. मधुकर निखाडे व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे जरीपटका :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०३.११.२०२६ चे १९.३० वा. ते २०.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. ८०, समता नगर, अशोक नगर, विशाल साखरे यांचे घरी किरायाने, जरीपटका, नागपुर येथे राहणारे फिर्यादी शुभम जितेंद्र रंगारी वय २८ वर्षे यांच्या पत्नी त्यांचे खाजगी कर्तव्यावर व फिर्यादी हे आपले राहते घराला कुलुप लावुन कामानिमीत्त घराबाहेर गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २८,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने, असा एकुण किंमती १,२२,१७७/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. अक्षय ठाकरे ९८२२९२६५४९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कपिलनगर :– फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी व त्यांचे मावसभावाचा मित्र असलेला आरोपी नामे सुरेंद्र जगदीश गायकवाड, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ७७, नागार्जुन कॉलनी, नारा, जरीपटका, नागपूर यांची ओळख होती. दिनांक ०१.०८.२०२४ ते दि. ०१.०४..२०२६ चे दरम्यान, आरोपीने फिर्यादीचे ओळखीचा फायदा घेवुन, त्यांचे नावावर एक ट्रक फायनान्स करुन तो आपले ताब्यात ठेऊन घेतला व बॅकेंची हफ्ते भरण्याची हमी दिली. आरोपीने सुरुवातीचे दोन हफ्ते भरल्यावर इतर कोणतेही हफ्ते न भरल्याने, फिर्यादीने नमुद ट्रक परत मागितला असता, आरोपीने ट्रक भंगारमध्ये

कापुन विकल्याचे सांगितले. फिर्यादी यांनी शहानिशा केली असता, तो ट्रक इतरही काही लोकांना विकल्याचे फिर्यादी यांना समजले. फिर्यादीचा ट्रक क्र. एम.एच ४० एन ९८३७ हा फिर्यादीस परत न देता, अप्रामाणिकपणे कापुन विकुन परस्पर विल्हेवाट लावली. ट्रक विक्रीची रक्कम ६,६८,०००/— रु. ची स्वत:कडे ठेऊन घेतले. तसेच, फिर्यादीचे मावसभाऊ आकाश नरेंद्र भालेराव यांचेकडूनही घेतलेले ६,५०,०००/—रु. सुध्दा परत केले नाही. आरोपीने स्वत:चे फायद्याकरीता, फिर्यादीचा विश्वासघात करून, त्यांचे व त्यांचे मावसभावाचे मिळुन एकुण १३,१८,०००/—रु. ची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी शुभम बलवीर शामकुंवर वय ३३ वर्ष रा. प्लॉट क्र. २२९, गली क्र. १, सान्यालनगर, कपिलनगर, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे सपोनि. दत्तात्रय वाघ ७३५०१५०७२० यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

<u>पोलीस ठाणे अंबाझरी</u> :— फिर्यादी विशाल ज्ञानोबा ढोणे, वय ४३ वर्षे, रा. मेंढला, ता. नरखेड, जि. नागपूर, ह. मु.—मयुर बसवंते यांचे घरी किरायाने, झाडेच्या दवाखान्याजवळ, पांढराबोडी, अंबाझरी, नागपूर यांनी पोलीस ठाणे अंबाझरी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. शुभांगी विशाल ढोणे, वय ३० वर्षे हया दिनांक २१.१०.२०२६ चे ०८.३० वा. त्यांचे राहते घरुन आपले कामावर गेल्या असता, घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **<u>बेपत्ता व्यक्तीचे वर्णन—</u>** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, डोळे—काळे,, केस—भुरे व लांब, अंगात—लाल काठाची काळी साडी व लाल ब्लाऊज घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.



सौ. शुभांगी

(ईतर)

<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. अति. सत्र न्यायाधीश, रुम क्र. ११६, नागपुर.	३००१६९/२००६	कलम ३८०,४५४,४५७ भादंवि	१) अरुण उर्फ जश्या रामाजी उईक, रा. यशवंत मेश्रामचे घरासमोर, कोतवाली, नागपुर. २) अज्जु लक्ष्मण हाडके, रा. हिवरी नगर पोलीस	१७.११.२०२६

				चौकी समोर, कोतवाली, नागपूर. ३) राहुल उर्फ छोटु रंगराव तायडे, रा. रमाई नगर चौक, आंबेडकर नगर, वाडी, नागपूर. ४) अनिल मोहाडीकर, रा. नत्थुजी गणपत राऊतचे घरी किरायाने, गोरोबा मैदान, लकडगंज, नागपूर.	

स्वा/—

(अंकुश राठोड)

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.